بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ

لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصاراللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# बदर युद्धातील परिस्थिती व प्रसंगाचा संक्षिप्त उल्लेख

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक १४ जुलाई २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ. بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ. الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ. إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ. صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ.

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहानंतर हुजूर अनवर म्हणाले: बदरच्या युद्धाबाबत, पवित्र प्रेषितांचे जीवन आणि घटनांचा उल्लेख केला जात होता. बदरची लढाई समाप्त झाली आणि अल्लाहने काफिरांचा अंत केला. या युद्धात सत्तर विरोधी मारले गेले ज्यामध्ये अनेक सरदार आणि वरिष्ठ लोक सामील होते.

कुरैशच्या सरदारांच्या अंतिमविधी संदर्भात हा उल्लेख आढळतो, सहिह बुखारीमध्ये असे म्हटले आहे की, एकदा पवित्र पैगंबर (स.) काबामध्ये नमाज पढताना सजदा करत होते तेव्हा मक्केतील काफिरांनी एका प्राण्याचे गर्भाशय त्यांच्या खांद्यावर ठेवले. पवित्र प्रेषित (स.) सजदाच्या स्थितीतच राहिले आणि ते पाहून काफिर हसत राहिले. काही वेळानंतर हजरत फातिमा तेथे आल्या आणि त्यांनी ती जड वस्तू खांद्यावरून काढून टाकली. या प्रसंगी, पवित्र प्रेषित (स.) यांनी प्रार्थना केली: हे अल्लाह! तु कुरैशांना पकड. मग त्यांनी अमर इब्न हिशाम, उत्बाह बिन रबीआ, शैबा बिन रबीआ, वलीद बिन उतबाह, उमय्या बिन खल्फ आणि इतर काही काफिरांचे नाव घेऊन अशी प्रार्थना केली: हे अल्लाह! तु स्वतः त्यांच्याशी बदला घे. हजरत अब्दुल्ला म्हणतात: अल्लाहची शपथ! मी स्वतः त्या सर्वांना बदरच्या दिवशी मरताना पाहिले. नंतर त्यांना ओढून बदरच्या खड्ड्यात टाकण्यात आले. या प्रसंगी पवित्र पैगंबर (स.) म्हणाले की, खड्ड्यातील लोक धिक्कारलेले आहेत.

हजरत अबू तलहा अन्सारी (र.ज.) यांनी सांगितले की, पवित्र प्रेषित (स.) यांनी बदरच्या लढाईच्या दिवशी चोवीस काफिरांना बदरच्या विहिरीत टाकण्याचा आदेश दिला होता. बदरमधून परतल्यावर, पवित्र प्रेषित (स.) या विहिरीच्या काठावर उभे राहिले आणि मक्केच्या काफिरांना त्यांच्या वडिलांच्या नावाने हाक मारण्यास सुरुवात केली आणि म्हणाले: किती बरे झाले असते जर तुम्ही अल्लाह व त्यांच्या प्रेषिताची आज्ञा स्वीकारली असती. आम्हाला ते सर्व लाभले ज्याचा वादा परमेश्वराने आपल्या संदेष्ट्याला केले होते.

हजरत साहिबजादा मिर्झा बशीर अहमद साहिब (र.ज.), या घटनेचा उल्लेख करतात आणि म्हणतात की पवित्र पैगंबरांच्या शब्दांवरून की, ''हे खड्ड्यात पडलेले लोकहो!''तुम्ही माझ्याशी लढलात आणि इतरांनी माझी मदत केली. यावरून असे दिसून येते की हे युद्ध काफिरांनी सुरू केली होती आणि पैगंबराला स्वसंरक्षणासाठी तलवार उचलण्यास भाग पाडले गेले.

चरित्रात्मक पुस्तकांमध्ये, बदरच्या लढाईच्या उल्लेखात, पवित्र प्रेषित (स.) यांच्या काहीं चमत्कारांचा देखील उल्लेख आहे. ओकाशा बिन मोहसन (र.ज.) बद्दल असा उल्लेख आहे की बदरच्या दिवशी ते तलवार तुटल्यापर्यंत लढत राहिले. यावर, ते पवित्र प्रेषित (स.) च्या सेवेत हजर झाले, पवित्र प्रेषित (स.) यांनी त्यांना लाकडाची काठी दिली आणि म्हणाले, ''काफिरांशी लढण्यासाठी याचा वापर कर.'' ओकाशाने लाकडाचा काठी हलवली तर ती त्यांच्या हातात तलवार मध्ये परिवर्तित झाली.

काफिरांच्या पराभवाची बातमी मक्केत कशी पोहोचली याचा उल्लेख अशा प्रकारे करण्यात आला आहे की, जेव्हा श्रद्धाहीनांनी घाबरून मक्केच्या दिशेने पळून गेले तेव्हा लज्जा आणि खेदामुळे त्यांना मक्केत कसे प्रवेश करावे हे सुचत नव्हते. जेव्हा काफिरांनी मक्केतील लोकांना कुरैशच्या प्रमुखांच्या मृत्यूची माहिती दिली तेव्हा त्यांना त्यावर विश्वास बसला नाही. कुरैशने लोकांना शोक करण्यापासून रोखले.

दुसरीकडे, पवित्र प्रेषित (स.) यांनी मदिनेच्या रहिवाशींपर्यंत युद्धविजयाची खबर प्रसारित करण्यासाठी हजरत अब्दुल्लाह बिन रवाहा यांना मदिनेच्या वरच्या भागात, तर हजरत जैद बिन हारीस यांना मदिनेच्या खालच्या भागात पाठवले.

हजरत ओसामा बिन जैद सांगतात की जेव्हा आम्ही हजरत उस्मान बिन अफफानच्या पत्नी हजरत रुकय्या बिंत रसुलुल्ला (स.) यांच्या कबरीची माती बरोबर केली तेव्हा आम्हाला विजयाची बातमी मिळाली.

जेव्हा जैद बिन हारिस (र.ज.) पवित्र प्रेषित (स.) च्या उंटावर स्वार होऊन मदिनेत दाखल झाले, तेव्हा दांभिक आणि यहूदी म्हणू लागले की युद्धात मुस्लिमांचा पराभव झाला आहे आणि (अल्लाह क्षमा करो) पवित्र प्रेषित (स.) देखील मारले गेले. म्हणूनच जैद पैगंबरांच्या उंटावर स्वार होऊन येत आहे. जेव्हा जैद बिन हरीस याने विजयाची सुवार्ता दिली आणि मृत्यु पावलेल्या कुरैश सरदारांची नावे सांगितली आणि कुरैशचे अमुक अमुक सरदार मारले गेले असे सांगितले, तेव्हा दांभिक लोक म्हणाले की हे कसे होऊ शकते. युद्धातील पराभव आणि पवित्र प्रेषितांच्या हत्येमुळे जैद वेडा झाला आहे.

विजयाच्या आनंदात पैगंबरांचे स्वागत करण्यासाठी मदिनेतील लोक मदिनेबाहेर आले. या मुस्लिमांचा आनंद अनन्यसाधारण होता.

या युद्धात मुस्लिमांना १५० उंट आणि १० घोडे युद्धधन म्हणून मिळाले. याशिवाय सर्व प्रकारचा माल(संपत्ती), शस्त्रे, कपडे, असंख्य कातडे, रंगवलेले चमडे, लोकर इत्यादी युद्धधन म्हणून मिळाले. अल्लाहचे दूत (स.) यांनीही आपला वाटा इतर साथीदारसमक्ष

ठेवला. साथीदारांनी पैगंबरांसाठी एक तलवार निवडली. त्याचप्रमाणे अबू जहलचा एक उंट पैगंबरांना मिळाला. चरित्र साहित्यामध्ये या तलवार आणि उंटाला खूप महत्त्व दिले गेले आहे. या तलवारीचे नाव होते 'जुल्फिकार' होते. नंतर, इतर युद्धांमध्ये, पवित्र पैगंबर (स.) ही तलवार आपल्याजवळ ठेवत असे. पैगंबरानंतर ही तलवार अब्बासी खलिफांकडे राहिली. अशाच प्रकारे तो उंट हुदैयबियाच्या समेटापर्यंत त्यांच्याकडे राहिला आणि हुदैयबियाच्या प्रसंगी त्यांनी (स.) हा उंट कुर्बान केला.

युद्धधन वाटप करताना पवित्र पैगंबर (स.) यांनी शहीद झालेल्या जवानांचा हिस्सा त्यांच्या वारसांना दिला. तसेच मदिनेतील प्रतिनियुक्त अधिकारी व इतर सोबती, जे विविध जबाबदाऱ्यामुळे युद्धात सहभागी होऊ शकले नाहीत, त्यांचा हिस्सा त्यांना अदा करण्यात आला.

बदर युद्धातील कैद्यांना खंडणी घेऊन सोडण्यात आले. खंडणीची रक्कम एक हजार ते चार हजार दिरहम पर्यंत होती. ज्यांना खंडणी देणे शक्य नव्हते त्यांच्यासाठी अशी अट होती की ते मदिना येथील मुलांना लिहण्याचा-वाचण्याचा शिक्षण देतील तेव्हाच त्यांची सुटका होईल. तसेच काहीं कैदी कमी खंडणी घेऊन तर काहींना खंडणी अदा केल्याविना मुक्त झाले. हजरत मिर्झा बशीर अहमद साहिब यांनी याबद्दल लिहिले आहेः मदीनेला पोहोचल्यावर, पवित्र प्रेषित (स.) यांनी कैद्यांबद्दल सल्लामसलत केली. अरबस्तानात, सामान्यतः कैद्यांना मारण्याची किंवा त्यांना गुलाम बनवण्याची प्रथा होती, परंतु ही बाब पवित्र प्रेषित (स.) च्या स्वभावाला फारच अप्रिय होती. आणि मग आत्तापर्यंत या संदर्भात कोणतीही दैवी आज्ञा प्रगट झालेली नव्हती. हजरत अबू बकर (र.ज.) म्हणाले की, माझ्या मते त्यांना, खंडणी घेऊन सोडावे, कारण हे लोक तर आपलेच भाऊ-बंधु आहेत, आणि शक्य आहे की उद्या त्यांच्यातूनच इस्लाम धर्माचे भक्त जन्माला येतील, पण हजरत उमर (र.ज.) यांनी याचा विरोधी केला आणि म्हणाले की धर्मादेशात नातेसंबंधाला स्थान नाही आणि हे लोक त्यांच्या कृतीमुळे मारले जाण्यास पात्र आहेत. म्हणून माझ्या मते या सर्वांना ठार मारले पाहिजे, उलट मुस्लिमांनी आपल्याच नातेवाईकांना आपल्या हाताने मारावे असा आदेश दिला पाहिजे. पवित्र प्रेषित (स.) आपल्या नैसर्गिक करुणेने प्रभावित होऊन, हजरत अबू बकर (र.ज.) यांच्या विचाराला पसंत केले आणि हत्येविरूद्ध निर्णय दिला आणि आदेश केले की विरोधींपैकी जे लोक खंडणी अदा करतील त्यांना सोडून द्यावे. पुढे यासंबंधात ईश्वरीय आज्ञा देखील अशीच प्रकट झाली. म्हणून प्रत्येक व्यक्तीची खंडणी एक हजार दिरहम ते चार हजार दिरहम अशी निश्चित करण्यात आली आणि अशा प्रकारे कैद्यांची सुटका करण्यात आली.

बदरच्या लढाईशी संबंधित तपशील पुढेही चालू राहील, असे सांगितल्यानंतर, हुजूर अनवर यांनी खालील नामवंत मृतकांच्या जीवनप्रसंगांचे उल्लेख करून त्यांची नमाज-ए-जनाजा अदा करण्याची घोषणा केली.

१. राणा अब्दुल हमीद खान साहिब काठगढ़ी, प्रचारक व उपप्रमुख वक्फे जदीद, पाकिस्तान.

२.श्री. नुसरत जहाँ अहमद साहिबा पत्नी मा. मुबश्शीर अहमद साहेब प्रचारक, अमेरिका.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ،
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔